


॥ अमर उष: प्रभा पातु भव वसंन्ते ॥

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि वाशिम.

द्वारा संचालीत

स्थापना- १९७१

श्री.वसंतराव नाईक कला व
श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,
मंगरुळपीर, जि वाशिम.

# माहिती पत्रक

२०१८ – २०१९

।। अमर उषः प्रभा पातु भव वसन्ते ।।

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि वाशिम.

द्वारा संचालीत

स्थापना- १९७१

श्री.वसंतराव नाईक कला

व

श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,

मंगरुळपीर, जि. वाशिम.

# माहिती पत्रक


## २०१८ – २०१९

प्रवेश प्रक्रिया दि. १४/०६/२०१८

ते

दि.२३.०६.२०१८ पर्यंत राहील


**विद्यार्थ्यांना महाविद्यालयमध्ये झेरॉक्स काढून मिळेल.**



## श्री.वसंतरावजी नाईक

...॥ आमचे भाग्य विधाता ॥...

✻ संस्थापक ✻



## दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द, ता.मानोरा, जि.वाशिम.

## ✲ कार्यवाहक संस्थापक ✲



आत्माराम राठोड

अध्यक्ष, स्था.व्य.समिती.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(असाधारण)

अधिसूचना

क्रमांक : १५८/२०१७ | दिनांक २२.१२.२०१७

विषय :— शैक्षणिक नियामिका शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९

**Subject :- Academic Calender...... 2018-19**

सर्व संबंधितांच्या माहिती करीता अधिसूचित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ ची शैक्षणिक नियामिका खालील प्रमाणे राहील.

It is notified for all concerned that, Academic Calender for the Academic Session 2018-19 shall be as under

तक्ता —१

| अ. क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक सत्र (प्रथम सत्र) | गुरुवार, दि. १४ जून २०१८ | शनिवार, दि. ३ नोव्हेंबर २०१८ | ११५ |
| २ | प्रवेश प्रक्रिया | गुरुवार, दि. १४ जून २०१८ | शनिवार, दि. २३ जून २०१८ | ०८ |
| ३ | शैक्षणिक दिवस(प्रथम सत्र) | सोमवार, दि. २५ जून २०१८ | शनिवार, दि. १३ ऑक्टोंबर २०१८ | ९० |
| ४ | दिवाळी परीक्षांची तयारी | सोमवार, दि. १५ ऑक्टोंबर २०१८ | शनिवार, दि. २० ऑक्टोंबर २०१८ | ०५ |
| ५ | महाविद्यालयीन/ विद्यापीठीय परीक्षा | सोमवार, दि. २२ ऑक्टोंबर २०१८ | शनिवार, दि. २४ नोव्हेंबर २०१८ | २६ |
| ६ | प्रथम सत्र अवकाश | सोमवार, दि. ५ नोव्हेंबर २०१८ | शनिवार, दि. २४ नोव्हेंबर २०१८ | १८ |
| ७ | शैक्षणिक सत्र (द्वितीय सत्र) | सोमवार, दि. २६ नोव्हेंबर २०१८ | शनिवार, दि. २७ एप्रिल, २०१९ | ११८ |
| ८ | अशैक्षणिक दिवस (सांस्कृतीक, क्रिडा, रा.से.यो. इत्यादी करीता) | सोमवार, दि. २६ नोव्हेंबर २०१८ | शनिवार, दि. ८ डिसेंबर, २०१८ | १२ |
| ९ | शैक्षणिक दिवस (द्वितीय सत्र) | सोमवार, दि. १० डिसेंबर २०१८ | शनिवार, दि. ३० मार्च, २०१९ | ९१ |
| १० | उन्हाळी परीक्षांची तयारी | सोमवार, दि. १ एप्रिल २०१९ | शनिवार, दि. ६ एप्रिल, २०१९ | ०६ |
| ११ | महाविद्यालयीन विद्यापीठीय उन्हाळी—२०१९ परीक्षा | सोमवार, दि.८ एप्रिल २०१९ | शनिवार, दि. ११ मे, २०१९ | २६ |
| १२ | द्वितीय सत्र अवकाश | सोमवार, दि. २९ एप्रिल २०१९ | शनिवार, दि. ८ जून, २०१९ | ३५ |

- प्रथम सत्र प्रारंभ होण्यापूर्वी अवकाश कालावधीत प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यांत यावी.
- Admission process may be started prior to Commencement of First session in vacation

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## सार्वजनिक सुट्या २०१८

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २०१८ वर्षातील सार्वजनिक सुट्या खालील प्रमाणे जाहीर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | सन/उत्सव/जयंती | दिनांक | वार |
|---|---|---|---|
| १) | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी | शुक्रवार |
| २) | महाशिवरात्री | १३ फेब्रुवारी | मंगळवार |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज जंयती | १९ फेब्रुवारी | सोमवार |
| ४) | होळी (दुसरा दिवस) | ०२ मार्च | शुक्रवार |
| ५) | महावीर जयंती | २९ मार्च | गुरुवार |
| ६) | गुड फ्रायडे | ३० मार्च | शुक्रवार |
| ७) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल | शनिवार |
| ८) | बुध्द पोर्णिमा | ३० एप्रिल | सोमवार |
| ९) | महाराष्ट्र दिन | ०१ मे | मंगळवार |
| १०) | रमझान ईद (ईद–उल–फितर)(शव्वल–१) | १६ जून | शनिवार |
| ११) | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट | बुधवार |
| १२) | पारशी नववर्ष (शहेनशाही) | १७ ऑगस्ट | शुक्रवार |
| १३) | बकरी ईद (ईद–उझ–झुआ) | २२ ऑगस्ट | बुधवार |
| १४) | गणेश चतुर्थी | १३ सप्टेंबर | गुरुवार |
| १५) | मोहरम | २० सप्टेंबर | गुरुवार |
| १६) | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोंबर | मंगळवार |
| १७) | दसरा | १८ ऑक्टोंबर | गुरुवार |
| १८) | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | ७ नोव्हेंबर | बुधवार |
| १९) | दिवाळी (बलीप्रतिपदा) | ८ नोव्हेंबर | गुरुवार |
| २०) | भाऊबीज | ९ नोव्हेंबर | शुक्रवार |
| २१) | ईद–ए–मिलाद | २१ नोव्हेंबर | बुधवार |
| २२) | गुरु नानक जयंती | २३ नोव्हेंबर | शुक्रवार |
| २३) | खिसमस | २५ डिसेंबर | मंगळवार |

टिप :– खालील सण रविवारी येत असल्यामुळे त्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यांत आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुढी पाडवा | १८ मार्च | रविवार |
| २) | राम नवमी | २५ मार्च | रविवार |

ब) स्थानिक सुट्टया नंतर जाहीर करण्यांत येईल.

टिप :१) सर्व संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठाचे स्नातकोत्तर विभागातील शैक्षणिक कर्मचाऱ्यांना (अँकेडेमिक स्टाफ) फक्त शैक्षणिक नियामके (अँकेडेमिक कॅलेंडर) प्रमाणे सुटया राहतील.

२)ज्या दिवशी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुट्टी असेल परंतू शैक्षणिक विभागालासुट्टी नसेल, त्या दिवशी प्राचार्य/विभागप्रमुख हे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याकरिता



सूचना देतील व त्याकरिता इतर दिवशी पर्यायी रजा मंजूर करतील. म्हणजे शैक्षणिक कामामध्ये येणाऱ्या अडचणी टाळता येतील.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग/विद्यापीठाद्वारे संचालित महाविद्यालये/विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शैक्षणिक कर्मचाऱ्यांना वरील तक्ता – १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रथम सत्र अवकाश, द्वितीय सत्र अवकाश व्यतिरिक्त खालील तक्ता – २ मध्ये दर्शविलेल्या सार्वजनिक सुटया राहतील.

## तक्ता– २

| अ.क्र. | सन/उत्सव/जयंती | दिनांक |
|---|---|---|
| १) | रमझान ईद (ईद–उल–फितर)(शव्वल–१) | शनिवार दि. १६ जून २०१८ |
| २) | स्वातंत्र्य दिन | बुधवार दि.१५ ऑगस्ट २०१८ |
| ३) | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | शुक्रवार दि. १७ ऑगस्ट २०१८ |
| ४) | बकरी ईद (ईद–उझ–झुआ) | बुधवार दि २२ ऑगस्ट २०१८ |
| ५) | गणेश चतुर्थी | गुरुवार दि. १३ सप्टेंबर २०१८ |
| ६) | मोहरम | गुरुवार दि. २० सप्टेंबर २०१८ |
| ७) | महात्मा गांधी जयंती | मंगळवार दि.०२ ऑक्टोंबर २०१८ |
| ८) | दसरा | गुरुवार दि. १८ ऑक्टोंबर २०१८ |
| ९) | खिसमस | मंगळवार २५ डिसेंबर २०१८ |
| १०) | प्रजासत्ताक दिन | शनिवार दि. २६ जानेवारी २०१९ |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | मंगळवार दि. १९ फेब्रुवारी २०१९ |
| १२) | महाशिवरात्री | सोमवार दि. ४ मार्च २०१९ |
| १३) | होळी (दुसरा दिवस) | गुरुवार दि. २१ मार्च २०१९ |
| १४) | महावीर जयंती | बुधवार दि. १७ एप्रिल २०१९ |
| १५) | अक्षय तृतीया | गुरुवार दि. १८ एप्रिल २०१९ |
| १६) | गुड फ्रायडे | शुक्रवार दि. १९ एप्रिल २०१९ |

खालील सुट्ट्या रविवारी येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | :– | दि. १४ एप्रिल २०१९ |
| २) बुध्द पोर्णिमा | :– | दि. १९ मे २०१९ |

## परिपत्रक

क्रमांक : ०१/२०१४ दिनांक १६/०१/२०१४

Revised Fee to be Prescribed for the Under Graduate and post Graduate courses in the faculty of Arts, Commerce, Science, Social science, Home Science and Law on grant in aid basis. Fees for Under Graduate course B.A, B.Com, B.Sc, B.Sc (Home-Sci) Fashion designing, BSW, L.L.B. and others.

| Sr.No. | Item/Head | Prescribed fee |
|---|---|---|
| 1 | Tution Fees | 800/- |
| 2 | Laboratory (B.A.B.Com.B.SW.L.L.B) other | 405/- |
| 3 | Lilbrary | 135/- |
| 4 | Games & Sports | 135/- |
| 5 | Extra Curricular Activities | 70/- |
| 6 | College Magzine | 70/- |
| 7 | Students Aid. Fund. | 25/- |
| 8 | Physical Efficiency Test | 25/- |
| 9 | Environmental Studies | 135/- |
| 10 | Facilities | 70/- |
| 11 | Identity Card | 30/- |
| 12 | College Examination | 100/- |
| 13 | Security | 50/- |
| 14 | Vehicle Stand | 50/- |

### University Fees

| Sr.No. | Item/Head | Prescribed fee |
|---|---|---|
| 1 | Annual Fee | 70/- |
| 2 | Carpus Fund | 05/- |
| 3 | S.W.F. | 10/- |
| 4 | Students Council fee | 05/- |
| 5 | Students Safety Insurance | 10/- |
| 6 | Emergency fund | 10/- |
| 7 | Sports fee | 50/- |
| 8 | I.U.S.M.Fee | 30/- |
| 9 | Enrolment fee | 100/- |
| 10 | Late Enrolment fee | 100/- |
| 11 | गाडगे बाबा अध्यासन | 01/- |

Exam fee Scheduled of S.G.B. Amravati University

| Sr.No. | Item/Head | Prescribed fee |
|---|---|---|
| 1 | Uni. Exam form fee | 05/- |
| 2 | Uni. Exam fee | 155/- |
| 3 | Central Valuation fee | 40/- |
| 4 | Viva-fee | 45/- |
| 5 | Envirnment fee (for B.A-II & B.Com-II) | 135/- |
| 6 | Computer Practical fee | 45/- |
| 7 | Exam Late fee | 45/- |



## अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि वाशिम.

द्वारा संचालीत

## श्री.वसंतराव नाईक कला व
## श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि वाशिम.

महाविद्यालय दि. २०.६.१९७१ रोजी नागपूर विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासनाच्या परवानगीने सुरु करण्यांत आले. या संस्थेचे हे एकमेव महाविद्यालय आहे.

दि. १ मे १९८३ साली अमरावती विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळे हे महाविद्यालय अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत असून महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे.

महाराष्ट्र शासनाने संस्थेला दिलेल्या जागेवर महाविद्यालयाची इमारत आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने महाविद्यालयाचे सर्व वर्ग नियमितपणे भरविण्यात येतात. विद्यार्थ्यांना शारिरीक, सांस्कृतीक खेळ विषयक बाबीमध्ये वेगवेगळया महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्पर्धेमध्ये तसेच राष्ट्रीय सेवा योजना द्वारा विविध उपक्रम, कार्यक्रम व विशेष शिबीर घेवून विद्यार्थ्यांना संधी दिल्या जाते.

महाविद्यालयाचे उत्कृष्ठ व चांगले ग्रंथालय असून त्यात या महाविद्यालयात मान्यता प्राप्त विषयाचे विविध अभ्यास मंडळामार्फत निर्धारीत करण्यांत आलेली पुस्तके, अभ्यासक्रमिकेत नमुद केलेल्या विविध लेखकांची संदर्भ पुस्तके, उच्च आणि चांगल्या दर्जाच्या लेखकांची पुस्तके इत्यादीमुळे ग्रंथालय समृध्द आहे. नियमित वर्ग व शिकविण्यांचे काम सक्षमपणे पार पाडल्या जाते.

तसेच विद्यापीठीय व कॉलेजच्या परीक्षा देखील चोखपणे होतात.

अध्यक्ष
स्था.व्य.समिती

आंतरराष्ट्रीय योग दिवस – दि. २१/०६/२०१८
श्री वसंतराव नाईक पुण्यतिथी दि. १८/०८/२०१८
श्री अमरसिंग नाईक पुण्यतिथी दि. १८/१०/२०१७
स्वातंत्र दिन :— १५ ऑगष्ट
प्रजासत्ताक/गणराज्य दिन :— २६ जानेवारी
महाराष्ट्र दिन :— १ मे

महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र दिनानिमीत्त, प्रजासत्ताक व महाराष्ट्र दिनानिमीत्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ठिक ७.१५ वाजता होईल. सर्व विद्यार्थ्यांना ध्वजारोहणा करीता वेळेवर उपस्थित राहावे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ...॥ विद्यापीठ गीत॥...

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन॥

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ॥
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळावे पंख मिळाले
दशसुत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले॥ १ जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले॥ २ जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले॥ ३

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले॥

....प्राचार्य डॉ.विठ्ठल वाघ



## * राष्ट्रगीत *

जनगण मन– अधिनायक जय हे
भारत – भाग्य विधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्रविड, उत्कल, वंग
विंध्य हिमाचल, यमुना, गंगा
उच्छल जलधि तरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे
गाहे तव जय गाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत – भाग्य विधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय जय हे ॥

*********

## * वंदे मातरम *

वंदे मातरम।
सुजलां सुफलां मलयजशीतलाम ।
सस्यश्यामलां मातरम्
शुभ्रज्योत्स्नां पुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनी सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरम ।
वंदे मातरम् ॥

# रा.से.यो. प्रार्थना

## इतनी शक्ती हमे देना

इतनी शक्ती हमे देना दाता
मन का विश्वास कमजोर होना
हम चले नेक रस्ते से हमसे
भुल कर भी कोई भुल होना

दुर अज्ञान के हो अंधेरे
तु हमे ज्ञान की रोशनी दे
हर बुराई से बचके रहे हम
जितना भी दे भरी झिंदगे हे
बैर होना किसी का किसी से
भावना मन मे बदले की होना
हम चले नेक रस्ते से हमसे
भुल कर भी कोई भुल होना

हमना सोचे हमे क्या मिला है
हमे यो सोच किया क्या है अर्पण
फुल खुशीयो के बाटे सभी को
सब का जिवन भी बनजाये मधुबन
आपणी करुणा का जल तू बहॉं के
करदे पावन हर एक मन का कोना
हम चले नेक रस्ते से हमसे
भुल कर, भी कोई भुल होना



# महाविद्यालयीन प्रवेशाची पात्रता व प्रवेशाबाबत माहिती

## विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयीन प्रवेशाची पात्रता
## माहिती व महत्वाची सूचना

संदर्भ :— क्रमांक संगाबा अवि/८/सी—८२९/२०१६ दि. २९.४.२०१६

उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सूचीत करण्यांत येते की, ज्या वर्गात व ज्या शाखेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी महाविद्यालयाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यांत प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात संपूर्ण माहितीसह भरुन दाखल करावे.

प्रवेश अर्जावर नुकताच काढलेला रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे.

संपूर्ण फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी चा पहिला हप्ता विद्यापीठाची फी व इतर फीसह भरणा प्रवेश घेतांना करावा लागेल. उर्वरित शिक्षण फी दुसऱ्या शैक्षणिक सत्रात भरावी.

प्रवेश पात्रता :—

बी.ए.—बी.कॉम भाग—१ मध्ये प्रवेशाकरीता उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी.

बी.ए.—बी.कॉम भाग २ व ३ मध्ये प्रवेशाकरीता आवश्यक असलेली विद्यापीठाची परीक्षा उत्तीर्ण किंवा विद्यापीठाच्या नियमानुसार ए.टी के.टी धारक विद्यार्थी.

## शैक्षणिक कार्यासाठी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शासकीय सवलती बाबत माहिती

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या आर्थिक सवलती मिळण्यासाठी विहीत नमुन्यात प्रपत्र भरुन कार्यालयात दाखल करावे. शासनाच्या आर्थिक सवलती शासनाने घालून दिलेल्या निकषाप्रमाणे राहतील.

विद्यार्थ्यांनी सूचना फलक रोज वाचावे.

१) भारत सरकार शिष्यवृत्ती :-

अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती, ओ.बी.सी, एस.बी.सी, जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मिळण्याकरिता विहीत नमुन्यात अर्ज ऑन लाईन भरावे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम बँकेतून मिळेल. त्याकरीता राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून खाते क्रमांक कार्यालयात सादर करावे. शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास संपूर्ण फी चा भरणा करावा लागेल.

२) ई.बी.सी. (E.B.C) :-

ज्या विद्यार्थ्यांच्या वडीलाचे/पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांनी ई.बी.सी. सवलतीचे विहीत अर्ज संपूर्ण माहितीसह व कागदपत्रासह प्रवेश घेतलेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत भरुन द्यावे लागेल. ई.बी.सी. सवलतीचे अर्ज तपासून मंजूर करण्याचे काम शासनाच्या संबंधीत खात्याचे आहे.

३) प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना सवलत (P.T.C.)

प्राथमिक शिक्षकांच्या मुला–मुलींना सवलत मिळण्यासाठी विहीत नमुन्यात संपूर्ण माहीती व आवश्यक त्या कागदपत्रासह कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत कार्यालयात भरुन द्यावे लागेल. सवलतीचे अर्ज तपासून मंजूर करण्याचे काम शासनाच्या संबधीत खात्याचे आहे.

४) मोफत शिक्षण (Freeship)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती, ओ.बी.सी, एस.बी.सी. च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न रु. ८ लाखच्या आत आहे अशा विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण (Freeship) मिळू शकते. त्या करीता त्यांना विहीत नमुन्यातील अर्ज संपूर्ण कागदपत्रासह ऑनलाईन भरावा लागेल. त्याची प्रत कॉलेजमध्ये दाखल करावी अन्यथा महाविद्यालयाची संपूर्ण फी भरावी लागेल.

५) अपंगत्वा बद्दल शिष्यवृत्ती

शारिरीक दृष्टया ४० % पेक्षा जास्त अपंग आहे. आणि सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याकडून अपंगत्वाचे फोटोसह प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे लागेल. अशा विद्यार्थ्याने कॉलेज कार्यालयातून विहीत अर्जाचे नमुने प्राप्त करुन प्रवेश घेतलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत संपूर्ण कागदपत्रासह कार्यालयात दाखल करावे. अपंगत्वाबद्दल शिष्यवृत्तीचे अर्ज तपासून मंजूर करण्याचे काम शासनाच्या संबंधित खात्याचे आहे.



महत्वाची सूचना

१) शिक्षण फी व इतर फी :—

पूर्ण फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्धे शिक्षण शुल्क व इतर शुल्क प्रवेशाच्या वेळी भरणे आवश्यक आहे. व उर्वरीत शिक्षण शुल्क द्वितीय सत्राच्या सुरुवातीला भरणे आवश्यक आहे. फी व इतर शुल्का बाबत कार्यालयात माहिती मिळेल.

२) ओळखपत्र :—

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. नविन रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो कार्यालयात देवून ओळखपत्र घ्यावे. महाविद्यालयात येतांना ओळखपत्र जवळ असणे अनिवार्य आहे. वर्षाच्या शेवटी ओळखपत्र कार्यालयात जमा करावे.

३) शैक्षणिक वर्षाच्या मध्येच महाविद्यालय सोडून गेल्यास विद्यार्थ्याकडून त्या वर्षाची संपूर्ण फी वसूल करण्यात येईल.

४) महाविद्यालयातील फर्निचर व इतर साहित्याच्या नुकसानीबद्दल विद्यार्थ्याकडून नुकसान भरपाई दंडासह वसूल करण्यांत येईल.

५) वर्गातील उपस्थिती (Attendance)

प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्गातील प्रत्येक विषयाची ७५ % उपस्थिती शासन परिपत्रक क्र.टी.इ.एम/३३९/७४९८/ता.शि–१ दि. १७ जूलै १९९६ च्या आदेशानुसार असणे बंधनकारक करण्यांत आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांची वर्गातील प्रत्येक विषयाची उपस्थिती ७५ % पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, ई.बी.सी., पी.टी.सी., फ्रीशिप शैक्षणिक सवलतीचा लाभ मिळणार नाही. तसेच वर्गातील व प्रत्येक विषयाची उपस्थिती ७५ % पेक्षा कमी असल्यास विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेचा फार्म भरता येणार नाही. व विद्यापीठाच्या परिक्षेला बसता येणार नाही. याची जबाबदारी आपली राहील. वर्गातील अनुपस्थिती बाबत तासिका प्रमाणे दंड मात्र भरावा लागेल.

महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याने शिस्तीने वागणे अनिवार्य आहे. महाविद्यालयात व महाविद्यालयाचे परिसरात विद्यार्थ्यांनी आपली वागणूक उत्कृष्ट ठेवावी, शिक्षकांशी, कर्मचाऱ्यांशी सौजन्याने वागावे.

६) महाविद्यालयाचे वर्ग वेळापत्रकाप्रमाणे होतील. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर वर्गात दररोज उपस्थित राहावे. प्रवेश घेतल्यानंतर कॉलेजमध्ये वर्गात उपस्थित न राहील्यास कॉलेजमधून केव्हाही नांव काढून टाकण्यात येईल. याची नोंद घ्यावी. याबाबत आपण स्वत: जबाबदार राहाल.

७) कॉलेज परिक्षा :—

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची साधारणतः फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवडयांत चाचणी परीक्षा होईल व चाचणी परिक्षेला सर्व विद्यार्थ्यांनी हजर राहणे आवश्यक आहे. गैरहजर राहिल्यास प्रत्येक विषयासाठी दंड आकारण्यात येईल.

८) विद्यापीठ परीक्षा :—

विद्यापीठाच्या नियमानुसार व वेळापत्रकाप्रमाणे होतील. विद्यापीठाचे परीक्षा फॉर्म व परीक्षा फी विद्यापीठाने ठरविलेल्या तारखेनुसार विद्यार्थ्यांनि कॉलेजमध्ये भरुन द्यावे. विहित तारखेत विद्यापीठ परीक्षा फॉर्म व फी न भरल्यास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील. अर्थात ७५ % टक्के वर्गातील प्रत्येक विषयाची उपस्थिती असलीच पाहिजे. ७५ % टक्के वर्गातील प्रत्येक विषयाची उपस्थिती नसल्यास विद्यार्थीनी कोणत्याही प्रकारचा बाहय दबाव आणल्यास त्याचे नांव तात्काळ कॉलेजमधून काढून टाकण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. यास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

९) शारिरीक क्षमता चाचणी :—

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार आणि महाविद्यालयाच्या वेळापत्रकानुसार शारिरीक शिक्षणाच्या तासिका नियमित होतील. सर्व विद्यार्थी /विद्यार्थीनीनी शारिरीक शिक्षणाच्या ७५ % तासिकेला उपस्थित राहणे आवश्यक आहे.

शैक्षणिक सत्राच्या अखेरीस सर्व विद्यार्थ्यांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. चाचणी परिक्षेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहील्यास दंड भरुन पुन्हा शारिरीक क्षमता चाचणी करुन घ्यावी लागेल. अन्यथा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेस बसता येणार नाही.

१०) ग्रंथालय :—

महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थी /विद्यार्थीनीना ग्रंथालयाचे सभासद अर्ज भरुन द्यावे लागेल. ग्रंथालयातून एका वेळी एक पुस्तक मिळेल. मुदत संपेपर्यंत पुस्तक परत न केल्यास प्रत्येक दिवसाला पुस्तक परत करेपर्यंतच्या दिवसापर्यंत दंड भरावा लागेल. दंड भरल्याशिवाय ग्रंथालयातून दुसरे पुस्तक मिळणार नाही.



ग्रंथालयातून घेतलेले पुस्तक परत करतांना पुस्तकातील काही पाने फाडली असल्यास पुस्तकांत काही ठिकाणी शाईने लिहिले असल्यास पुस्तकातील पाने फाटलेली असल्यास, पुस्तक खराब किंवा विद्रूप केल्यास पुस्तकांची पूर्ण किंमत व तेवढयाच रक्कमेचा दंड भरावा लागेल.

ग्रंथालयातील पुस्तकांची देवाण—घेवाण रांगेत उभे राहून सहजतेने, शिस्तीने, नम्रतेने व आज्ञाधारकपणे करावी. ग्रंथपाल, परिचर यांचेशी आज्ञाधारक व नम्र विद्यार्थी म्हणून सभ्यतेची, शिस्तीची व आज्ञाधारकपणाची वागणूक ठेवावी.

११) विद्यार्थी स्वयं रोजगार व मार्गदर्शन केंद्र :—

विद्यार्थ्यांना रोजगार विषयक माहितीसाठी महाविद्यालयात मार्गदर्शन केंद्र आहे. विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केंद्र प्रभारी शिक्षकांशी संपर्क ठेवून व कार्यक्रमांना उपस्थित राहून आपल्या नावाची नोंदणी करुन घ्यावी व मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा.

*********

महाविद्यालयात उपलब्ध अभ्यासक्रम

पदवी पर्यंत कला व वाणिज्य शाखेस अमरावती विद्यापीठाची मान्यता आहे.

कला शाखा

खालील मान्यताप्राप्त विषय महाविद्यालयात शिकविले जातात.

बी.ए.भाग — १ सेमेस्टर १ व २

विषय :—

| | | |
|---|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी | ३) अर्थशास्त्र |
| ४) राज्यशास्त्र | ५) इतिहास | |

बी.ए.भाग—२ सेमेस्टर ३ व ४

| | | |
|---|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी | ३) अर्थशास्त्र |
| ४) राज्यशास्त्र | ५) इतिहास | ६) पर्यावरण |

बी.ए.भाग—३

| | | |
|---|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी | ३) अर्थशास्त्र |
| ४) राज्यशास्त्र | ५) इतिहास | |

*********

विशेष सूचना :—

या शिवाय ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी वाङ्‌मय किंवा मराठी वाङ्‌मय घ्यावयाचे असेल त्यांना विद्यापीठाच्या खालील नियमानुसार विषय घेता येईल. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल. अशा विद्यार्थ्यांना कॉलेजला हमीपत्र लिहून द्यावे लागेल. स्वतः अभ्यास करुन विद्यापीठाच्या परिक्षेला बसता येईल.

As amended by the Executive Council, dated 25/26-4-81

5-B College Students intending to study language (Compulsory or Optinal) Shall be Permitted to offer the subject in the college where provision for the teaching is not made, by allowing them to appear for the examination on the basis of private study in the subject under a teacher or in an institution/ college recognized for the purpose by the University.

---------*********---------

## वाणिज्य शाखा

खालील मान्यताप्राप्त विषय महाविद्यालयात शिकविले जातात.

### बी.कॉम.भाग–१ सेमेस्टर– १

विषय :–

| | |
|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी |
| ३) प्रिन्सीपल ऑफ एकॉनामिक्स | ४) प्रिन्सीपल ऑफ बिजनेस ऑरगनायझेशन |
| ५) अॅडव्हान्स अकाउन्टसी | ६) कॉम्प्युटर फंडामेंटल अॅन्ड ऑपरेटींग सिस्टम–१ |

### बी.कॉम.भाग–२ सेमेस्टर– २

| | |
|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी |
| ३) बिजनेस एकॉनामिक्स | ४) प्रिन्सीपल ऑफ बिजनेस मॅनेजमेन्ट |
| ५) फायनॉन्सीयल अकाउंटींग | ६) कॉम्प्युटर फंडामेंटल अॅन्ड ऑपरेटींग सिस्टम–२ |

### बी.कॉम.भाग–३

| | |
|---|---|
| १) आवश्यक इंग्रजी | २) आवश्यक मराठी |
| ३) व्यवसायीक पर्यावरण (B/E) | ४) परिव्यय व प्रबंधकीय लेखाकर्म (CMA) |
| ५) व्यवसाय व प्रमंडळ कायदे (BFC) | ६) इंटरनेट अॅन्ड वर्ड वाईब वेब (WWW) |
| ७) ई–कॉमर्स (EOE) | |

---------*********---------

महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाविषयी माहिती :–

### १) राष्ट्रीय सेवा योजना :–

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजना युनिट मंजूर आहे. ज्या विद्यार्थी /विद्यार्थीनींना राष्ट्रीय सेवा योजनेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांचेशी संपर्क करुन अर्ज



करावेत. निवड यादी नंतर जाहीर करण्यांत येईल.

रा.से.यो. मध्ये निवड झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीनी संपूर्ण शैक्षणिक सत्रात रा.से.यो कार्यक्रमात भाग घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे ७ दिवसीय विशेष शिबीर होईल. या शिबीरामध्ये शिस्तबध्द, होतकरु, उत्कृष्ट व प्रामाणिक विद्यार्थी/ विद्यार्थीनीची निवड केली जाईल. नियमित रा.से.यो. व विशेष शिबीरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार प्रोत्साहनपर गुण मिळतील. जे विद्यार्थी/विद्यार्थीनी रासेयोच्या विविध कार्यक्रमात गैरहजर राहतील किंवा गैरवर्तणूक करतील अशा विद्यार्थी/विद्यार्थीनींना नियमित रा.से.यो. पथकातून विशेष रासेयो शिबीरातून काढून टाकण्यांत येईल व दंड करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. यास नियमित रासेयो व विशेष रासेयो शिबीरातील विद्यार्थी/विद्यार्थीनी स्वत:जबाबदार राहतील.

### २) विविध खेळाच्या स्पर्धा :–

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शारिरीक शिक्षण व रंजन विभागामार्फत आंतर महाविद्यालयीन विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यांत येतील. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनींना विविध खेळामध्ये शैक्षणिक प्रगती बरोबर आपले क्रिडा नैपुण्य विकसित करण्याच्या हेतूने महाविद्यालयांत हॉलीबॉल, खो–खो, कबड्डी, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, भाला फेक, थाळी फेक, धावणे व मैदानी देशी खेळ स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.

त्या दृष्टीने नियमित सराव करण्यासाठी खेळाडूंनी स्वयंस्फुर्तिने खेळ मैदानावर वेळेवर हजर राहणे आवश्यक राहील

आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठीय खेळाच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार प्रोत्साहनपर गुण मिळतील

### ३) युवक महोत्सव अंतर्गत सांस्कृतीक स्पर्धा :–

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा तर्फे दरवर्षी महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनी करीता युवक महोत्सव व सांस्कृतीक कार्यक्रमा अंतर्गत विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धा घेण्यांत येतात. उदा. समुहगान, सुगम संगीत, वक्तृत्व स्पर्धा, भावगीत स्पर्धा, स्पॉट पेंटींग, रांगोळी स्पर्धा, लोकनृत्य, समुहगान, इत्यादी स्वरुपात असतात. विद्यार्थी/विद्यार्थीनी ज्या स्पर्धेत भाग घेत असेल त्या स्पर्धेकरीता लागणारे साहित्य त्यांना आणावे लागेल.

वरील स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार प्रोत्साहनपर गुण मिळतील.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ प्रोत्साहनपर गुणबाबत माहिती :—

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अध्यादेश क्र. १ सन १९८५ नुसार

| | |
|---|---|
| १) नियमित रा.से.यो. मध्ये १२० तास काम केल्याबद्दल. | ५ गुण |
| २) रा.से.यो.त ७ दिवशीय शिबीरामध्ये सहभाग बद्दल. | १ गुण |
| ३) रा.से.यो. विशेष शिबीरात २ वेळा सहभाग. | २ गुण |
| ४) रक्तदान १ वेळा केल्यास. | २ गुण |
| ५) रक्तदान २ वेळा केल्यास. | ४ गुण |
| ६) रक्तदान २ वेळा पेक्षा जास्त वेळा केल्यास. | ५ गुण |
| ७) आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धेत सहभाग प्रत्येक खेळात. | ३ गुण |
| ८) सं.गा.बा.अ. विद्यापीठाच्या युवक महोत्सवात सहभाग प्रत्येक स्पर्धेसाठी. | ३ गुण |
| ९) राज्य शासनाच्या योजने प्रमाणे सांखीकीय माहिती संकलन केल्या बद्दल. | ५ गुण |

## विद्यार्थी / विद्यार्थीनीना विशेष सूचना.....

१) महाविद्यालयाची शिस्त काटेकोरपणे पाळावी लागेल.

२) अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार कोणत्याही परिस्थितीत अंतीम तारखे नंतर कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाही.

३) प्रवेश अर्जातील सर्व माहिती काळजीपूर्वक स्वहस्ताक्षरात भरावी.

४) प्रवेश अर्जासोबत मुळ टी.सी. ,गुणपत्रिका व इतर आवश्यक प्रमाणपत्रे जोडावी.

५) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येकास शिस्त व वर्गात नियमितपणे उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

६) प्रवेश अर्ज, शिष्यवृत्ती अर्ज, ई.बी.सी., पी.टी.सी., फ्रीशिप परिक्षा फॉर्म, शुल्क अन्य कागदपत्रे महाविद्यालयात दाखल करण्यांची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. आपल्याशी संबंधीत असलेले अर्ज व इतर आवश्यक कागदपत्राची पूर्तता दिलेल्या मुदतीच्या आत करावी. अन्यथा होणाऱ्या संभाव्य नुकसानीस आपण स्वत: जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

प्राचार्य
श्री व.ना कला व श्री अ.ना.वाणिज्य
महाविद्यालय, मंगरुळपीर जि वाशिम